स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मानव्य विद्यापीठातील विद्याशाखेच्या

अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पदी सादर करण्याच्या शोधप्रबंधाची रूपरेषा

शोध प्रबंध शीर्षक (Title of Research)

लातूर व नांदेड जिल्ह्याच्या कृषी क्षेत्रातील महिला शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास

* संशोधक *

प्रशांत गोविंद वाघमारे

(एम.ए. अर्थशास्त्र)

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ . बालाजी तुळशीराम घुटे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

दयानंद कला महाविद्यालय, लातूर.

सामाजिक संकुले, उपविभाग लातूर – ४१३५३१

डिसेंबर २०२४

अनुक्रमणिका

अ. क्र.	सामग्री	पान क्र.
1	प्रस्तावना	3
2	विषय निवड हेतू	4
3	संशोधनाचे उद्दिष्टे	5
4	संशोधनाची गृहीतके	6
5	संशोधन पद्धती	6
6	तथ्य संकलन पद्धती	7
7	संशोधन कार्यक्षेत्र	7
8	संशोधन कालावधी	8
9	संशोधन व्याप्ती	8
10	संशोधन मर्यादा	8
11	प्रकरण मांडणी	10
12	शेतमजूर महिलांची आर्थिक व सामाजिक स्थिती	12
13	समस्यांचे क्षेत्र :	13
14	संदर्भ सूची	14

प्रस्तावना – (Introduction)

मानवी इतिहासात महिलांचा कृषी व्यवसायातील सहभाग प्राचीन काळापासून महत्त्वाचा असून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महिलांचे स्थान अतिशय महत्वाचे आहे. शेती हा व्यवसाय भारतासारख्या विकसनशील देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला आहे. राष्ट्राच्या आर्धिक व सामाजिक विकासामध्ये शेती क्षेत्राचे अनन्य साधारण महत्व आहे. भारतातील ग्रामीण भागातील लोकांचा केवळ व्यवसाय नव्हे तर तो जीवनमार्ग आहे. प्राचीन काळापासून शेती व्यवसायात काम करणाऱ्या महिलांची संख्या अधिक असून त्या शेतकरी किंवा शेतमजूर म्हणून काम करताना दिसतात. महिला शेती व्यवसायातील व घरगुती कामे सुद्धा करताना दिसून येतात. शतकानुशतकांपासून महिला त्यांच्या कुटुंबासाठी विविध प्रकारचे कार्य करत असतात. त्या दिवसातील १६ तास काम करीत असतात. ग्रामीण भागातील महिला शेतात तर राबतातच पुन्हा घरच्या कामाची जबाबदारी संपूर्णपणे त्याच पहात असतात. तसेच प्राचीन काळापासून महिला घरकामाची जबाबदारी पार पाडून पुरुषांना अन्य महत्त्वाच्या कामात मदत करतात. विशेषतः ग्रामीण भागातील महिलांची भूमिका महत्वपूर्ण दिसून येते. कारण घरातील सर्व कामे करून या महिला शेतीमध्ये पेरणी कापणी, मळणी, खुरपणी इत्यादी कामे करतात कृषी व्यवसायातील महिला कामगारांपैकी शेतमजूर महिलांचे प्रमाण होते. कृषी व्यवसायातील कामाचे स्वरुप लक्षात घेता महिलांचा शेती कामात अधिक सहभाग असल्याचे दिसून येते. शेतजमिनीच्या मशागती पासून तर उत्पादन निघेपर्यंतच्या होणाऱ्या सर्वच कामात महिलांचा सहभाग सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत असतो. त्यांच्या सहभागाची खरी सुरुवात घरापासूनच होत असते. घराशेजारी असणारा गोठा साफ करणे, दूध काढणे, जनावरांना चारा घालणे, खुरपणी, लावणी, पेरणी काढणी, वेचणी यासारखी सर्व कामे महिला करीत असतात. कृषी व्यवसायाला पुरक असणाऱ्या व्यवसायातही महिलांचे योगदान मोठ्या प्रमाणात आहे. रेशीम उद्योग, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय, शेळी, मेंढीपालन यासारख्या जोडव्यवसायातही महिला

कार्य करताना दिसून येतात. कृषी विपणन क्षेत्र व ग्रामीण लघु उद्योगात देखील महिला मोठ्या प्रमाणात सहभागी असून शारीरिक श्रम करताना दिसून येतात. कृषी व्यवसायात महिलांचा सहभागही जमेची बाजू असून कृषी व्यवसाय हा महिलांवर आधारित व्यवसाय आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. तसेच महिलांना बऱ्याच सामाजिक आर्थिक समस्या भेडसावत आहेत. आजही महिला मुख्य प्रवाहात दिसून येत नाहीत म्हणूनच ग्रामीण भागातील महिलांची ओळख शेतमजूर म्हणूनच आहे. शेती व्यवसायात काम करणाऱ्या महिला असो की, पुरक व्यवसायात काम करणाऱ्या महिलांना ग्रामीण महिला उद्योजकांचा दर्जा प्राप्त झाल्यास ग्रामीण भागाचा कायापालट झाल्याशिवाय राहणार नाही. "महिला जेव्हा प्रगती करायला लागतात, तेव्हा कुटुंब, गांव, देशाची ची प्रगती व्हायला लागते" असे भारताचे माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे मत होते. देशाच्या व राज्याच्या अर्थव्यवस्थेतील महिलांच्या कार्याला महत्त्वाचे स्थान असून त्याकडे दुर्लक्ष करणे चुकीचे ठरेल. म्हणून मी लातूर व नांदेड जिल्ह्यातील महिला शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा विषय निवडलेला आहे.

- **विषय निवड हेतू –(Objective of subject choice)**

भारत हा कृषिप्रधान देश असून सन १९५१ पासून भारत सरकारने आर्थिक विकासाकरिता पंचवार्षिक योजनांना सुरुवात करून आर्थिक विकासाच्या दिशेने पहिले पाऊल टाकले. सन १९६५ च्या हरितक्रांतीने देशातील कृषी क्षेत्रातील संबंधित असणारा शेतमजूर मात्र आर्थिक व सामाजिक विकासापासून वंचित राहिला. कृषी क्षेत्राचा मुख्य सुत्रधार म्हणजे शेतमजूर शेतमजुरांचा आर्थिक विकास हा त्याला मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून असतो. कृषी क्षेत्रातील पुरुष शेत मजुरासोबत स्वीशेतमजूर ही महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते. महिला शेतमजुरांचे साधारणपणे ! कुशल व अकुशल असे वर्गीकरण लक्षात घेता असे दिसून येते की, साधारणपणे शिक्षित व कुशल लोकांना उत्पन्न चांगले मिळते व त्यामुळे उत्पन्नवाढीमुळे बचत होताना दिसते तर अकुशल मजूरांच्या बाबतीत कामाचे स्वरुप हे हीन, कमी मजूरीचे त्यामुळे त्यांना उत्पन्न कमी मिळते व त्यांचे

जीवनमानही आर्थिक हालाखीचे दिसून येते. मात्र त्यांना मिळणारे वेतन ही कमी असते. त्यामुळे त्यांना हलाखीचे जीवन जगावे लागते. केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकारने शेतमजुरांकरिता विविध कल्याणकारी योजना, चौकशी समित्या स्थापन केल्या. पण मोजक्याच योजना त्यांच्यापर्यंत पोहचल्या. अकुशल मजूरांना अधिक काळ श्रम करूनही मिळणारा कमी मोबदला, त्यातून दैनंदिन गरजा, मुलांचे शिक्षण ते पूर्ण करू शकत नाहीत. त्यामुळे ते दारिद्रयाच्या दृष्टीचक्रात अधिक अडकले जातात म्हणून मी या संशोधनात लातूर व नांदेड जिल्हयातील कृषि क्षेत्रातील महिला शेतमजुरी करणा-या महिलांचाआर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास करणार असून महिलांना मजूरी व्यतिरिक्त दुसरे उत्पन्नाचे साधन उपलब्ध आहे का ? त्यांना देण्यात येणारे वेतन योग्य आहे का ? महिलांच्या संख्यात्मक व गुणात्मक परिस्थितीचा अभ्यास त्यांचे समाजातील स्थान याचा अभ्यास करून त्यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने एक प्रयत्न म्हणून लातूर व नांदेड जिल्ह्यामधील महिला शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास सन २०१९ ते २०२४ या विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे – (Objective of the Research)

१) लातूर व नांदेड जिल्हयामधील महिला शेतमजुरीच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

२) महिला शेतमजुराच्या बाबतीत कार्य क्षेत्रातील महिलांना मिळणाऱ्या योजनांचे अध्यन करणे.

३) महिला शेतमजूरांच्या संख्यात्मक व गुणात्मक परिस्थितीचा अभ्यास करणे.

४) महिला शेतमजुराच्या शेतमजुरी दरातील बदलाचे अध्ययन करने.

५) महिला शेतमजुरांसाठी असलेल्या सरकारी योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

- **संशोधनाची गृहितके - (Hypothesis of Research)**

1) लातूर व नांदेड जिल्ह्यातील शेतमजूर महिलांची आर्थिक व सामाजिक स्थिती खालावलेली आहे.

2) लातूर व नांदेड जिल्ह्यातील बहुतांशी महिला शेतमजुर यांना शासनाच्या योजनाबद्दल त्यांच्यासाठी असणाऱ्या योजनांची अल्प माहिती आहे.

3) लातूर व नांदेड जिल्ह्यातील महिला शेतमजूर यांच्या कार्यक्षमतेबद्दल अचुक माहिती नाही.

4) लातूर व नांदेड जिल्ह्यातील महिला शेतमजुर यांना मिळणाऱ्या मजुरीमध्ये एकसारखेपणा नाही.

5) महिला शेतमजुर त्यांच्यासाठी असणाऱ्या सरकारी योजनांच्या अंमलबजावणी बाबतीत उदासीन आहेत.

- **संशोधन पध्दती : (Research Methodology)**

कोणत्याही विषयातील संशोधन करत असताना संशोधनशास्त्र शुद्ध व्हावे, अचूक निष्कर्ष निघावेत प्रस्तुत संशोधन सामाजिक शास्त्रावर आधारित असल्याने सखोल अध्यन करण्यासाठी व संकलित तथ्यांवरील अहवालाची मांडणी वाचकाला कळावी म्हणून वर्णनात्मक तसेच चिकित्सक अध्ययनाचे निष्कर्ष विश्लेषणात्मक पद्धतीने मांडले जातील हे अध्यन प्राथमिक आणि दुय्यम अश्या दोन्ही स्रोतावर आधारित असेल प्रत्यक्ष्य मुख्यभार प्राथमिक स्तोत्रावर असेल व निरीक्षन मुलाखत प्रश्नावली अनुसूची याचा वापर प्रस्तुत संशोधनात घेतला जाईल.

अ) नमुना निवड पध्दती : (Sample Selection Method)

लातूर व नांदेड जिल्हयातील एकूण २६ तालुके असून त्यातून नांदेड जिल्हयातील तीन तालुके उमरी, भोकर, मुदखेड , आणि लातूर जिल्हयातील तीन तालुके चाकूर,

जळकोट आणि अहमदपूर असे एकूण ६ तालुक्यातून १५ ते २० गावातून प्रत्येकी २० महिलांची निवड केली जाणार आहे. असे एकूण ८० ते ९० गावातून १३०० महिला शेतमजुरांचा अभ्यास करण्याकरिता निवड केली आहे. त्यांची प्रत्यक्ष निरीक्षन मुलाखती, अनुसूची प्रश्नावली प्राथमिक साधनांच्या सहायाने तथ्यसंकलन माहिती संकलित करण्यात येणार आहे. अश्या एकूण १३०० महिला शेतमजुरांची नमुना निवडीचा वापर करणार असून सहेतूक नमुना निवड वापरला जाणार आहे.

ब] तथ्य संकलन पद्धती : (Fact Collection Methods)

या अभ्यासाकरिता संशोधकाने तथ्य संकलनाकरिता पुढील प्रमाणे प्राथमिक व द्वितीय तथ्य संकलन पध्दतीचा वापर केला आहे.

1)**प्राथमिक स्रोत** : (**Primary Scource**)

प्राथमिक माहिती ही निवड केलेल्या महिला शेतमजुरांना प्रत्यक्ष भेटून त्यांचे निरीक्षण करून प्रश्नावलीद्वारे तथ्यांचे संकलन करण्यात आले.

2)**द्वितिय स्रोत**:(**secondary Source**)

द्वितीय माहिती राज्यपातळीवरील विभागीय जिल्हा पातळीवरील माहिती, महाराष्ट्र राज्याचा सांख्यिकीय गोषवारा मानव विकास अहवाल, अहवाल, जिल्हा गॅझेट आर्थिक व सामाजिक समालोचन, वर्तमानपत्र, मासिके, प्रकाशित ग्रंथ गुगल इंटरनेट व इतर प्रकाशित माहितीचा वापर करण्यात येणार आहे.

- **संशोधन कार्यक्षेत्र : (Research Work Methods)**

प्रस्तुत संशोधन कार्यात लातूर व नांदेड जिल्हयातील महिला शेतमजुरांचा आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास उमरी, भोकर, मुदखेड , चाकूर, जळकोट

आणि अहमदपूर हे संशोधनात लागू करण्यात आले आहेत. म्हणजेच प्रस्तुत अभ्यासाची व्याप्ती लातूर व नांदेड जिल्ह्यापुरतीच मर्यादित असणार आहे.

- **संशोधनाचा कालावधी : (Research Period)**

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासाकरिता (सन २०१९ ते सन २०२४) असा ५ वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

- **संशोधनाची व्याप्ती : (Scope of Research)**

प्रस्तुत संशोधन कार्यात नांदेड जिल्हयातील महिला शेतमजुरांचा आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास प्रस्तुत संशोधनातूनलागू करण्यात येणार आहे.

संशोधनाची मर्यादा : (Limitations of The Research)

प्रस्तुत संशोधनातील माहितीचे संकलन, नमुना निवडपध्दतीने, प्रश्नावलीद्वारे किंवा मुलाखत, अनुसूचीद्वारे संकलित करण्यात येणार आहे. परंतु महिला शेतमजुरांच्या शिक्षणाचे अल्पप्रमाण, लाजाळूपणा व गोपनियता यामुळे माहिती संकलनावर मर्यादा येऊ शकते तसेच माहितीतील विश्वसनीय आकडेवारीचा अभाव, शासकीय गोपनीयता व माहितीच्या अपुरेपणामुळे माहिती संकलनावर मर्यादा पडते. शेतमजूर महिलांच्या कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे अध्ययन : दुसऱ्याच्या मालकीच्या शेतीवर अंगमेहनतीने काम करून जो मजुरी कमवितो तो शेतमजूर' अशी आपण शेतमजुराची व्याख्या करू शकतो. ही मजुरी म्हणजेच मोबदला. हा मोबदला रोख पैशात वस्तुरूपात अथवा उत्पादनातील हिश्याच्या स्वरुपात असू शकतो. असे शेतमजूर तीन प्रकारचे आढळतात.

1) भूमिहीन शेतकरी

2) अल्प भूधारक

3) अत्यल्प भूधारक

शेतमजूर महिला : (Female Farm Labour)

शेतमजुरांचे वर्गीकरण केले तरी शेतमजूर पुरुष व महिला असे विभाजन करता येते. यात पुरुष शेतमजूर यापेक्षा महिला शेतमजुरांना त्यांच्या कुटुंबाकडे अधिक लक्ष द्यावे लागते. घरात बऱ्याचवेळा अनेक समस्यांना तोंड देवून त्यांना त्यांचा संसार सांभाळावा लागतो. अनेक शेतमजूराचे वर्गीकरण केले तरी शेतमजूर पुरुष व महिलांना असे घरची व बाहेरच्या अशी दोन्हीही परिस्थिती सांभाळावी लागते. त्यांना समस्या असतात. त्या सर्व समस्या त्यांना भेडसावत असतात. त्या सर्व वेळा या शेतमजूर महिलांच्या पतीचे निधन झालेले असते. अशा वेळेस त्यांना सर्व कुटुंबाला सोबत घेवून जगावे लागते. घरात कुटुंबाच्या उदरनिर्वाहाच्या आरोग्याच्या शैक्षणिक अशा अनेक समस्या असतात. त्या सर्व समस्यांना एकट्या महिलेला सामोरे जावून सोडवाव्या लागतात. या शेतमजूर महिला शेतमजूर होण्यामागे अनेक कारणे असतात. ग्रामीण भागात उदरनिर्वाहाचे साधन शेती असते. पण बऱ्याच कुटुंबाकडे आवश्यक तेवढी शेती नसते. त्यामुळे दुसऱ्यांच्या शेतात जावून शेतमजुरी करावी लागते. केवळ पतीने कमावून आणलेले उत्पन्न पूर्ण कुटुंबासाठी पर्याप्त नसते. त्यामुळे महिलेला शेतमजूररी कडे वळावे लागते. ग्रामीण भागात महिला शेतमजूर होण्याची कारणे तसेच त्यांना येणाऱ्या समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येतात.

- **महिला शेतमजूर निर्माण होण्याची कारणे:**

(**Reasons for the Emergence of Female Farmer Labours**)

घरातील जास्त सदस्य संख्या असल्यामुळे महिलांना शेतमजूरी करणे भाग पाडले जाते. शेतीचे अल्पप्रमाण असल्यामुळे मजुरी करण्याची गरज पडते. ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जात असल्यामुळे स्त्रीयांमध्ये शिक्षणाचा अभाव जाणवतो. घरातील सदस्य संख्येत वाढ असल्यामुळे महिलांना रोजगार करावा लागतो. संयुक्त कुटूंब असल्यामुळे महिलांना कोणत्याही गोष्टीचा लाभ घेता येत नाही म्हणून शेतमजुरी करावी लागते. पतीला कमी मजुरी असल्यामुळे महिलेला मजुरी

करणे भाग पाडले जाते. महिलेचा पती व्यसनाधीन असल्यामुळे तिला रोजगार करावा लागतो. महिलेचा पती मृत्यू पावल्यामुळे कुटूंबाची सर्व जबाबदारी त्या महिलेवर आल्यामुळे तिला शेतमजूरी करावी लागते. व आपला उदरनिर्वाह करावा लागतो

शेतमजूर महिलांच्या समस्या :(Problems of Femal FarmWorkers)

१.	कौटुंबिक समस्या	२.	आरोग्यविषयक समस्या
३.	आर्थिक समस्या	४.	सामाजिक समस्या

- **प्रकरण मांडणी :**

1) **प्रकरण पहिले|: प्रस्तावना व संशोधन पद्धती :**

(Introduction And Research Methodology)

प्रस्तुत प्रकरण प्रस्तावना व संशोधित संबंधित आहे. यात लातूर व नांदेड जिल्ह्यातील महिला शेतमजुरांची आर्थिक सामाजिक स्थितीची प्रस्तावना, संकल्पना, समस्या सुत्रण, संशोधनाची उद्दिष्टये, संशोधनाची गृहिते, विषय निवडीचा हेतू, संशोधन पद्धती, संशोधनाचा कालावधी, संशोधन व्याप्ती, संशोधन मर्यादा व प्रकरण मांडणी यांचा प्रस्तुत प्रकरणात समावेश केला जाणार आहे.

2) **प्रकरण दुसरे : संशोधन साहित्यांचा आढावा -**

(**Review of Research literature)**

भारतीय अर्थव्यवस्थेतील महिलांचा कृषी क्षेत्रातील स्थिती व संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे. भारतातील महिला शेतमजुरांची स्थिती, भारतीय

अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्त्व, भारतातील शेतमजुरांची स्थिती आणि विषयाला अनुसरून साहित्य वाङमयाचा आढावा घेण्यात येणार आहे. यात महिला शेतमजुरांविषयी ज्या विचारवंतांनी, लेखकांनी व संशोधकांनी जे अध्ययन केलेले आहे त्या संशोधन अध्ययनाचा गोषवाराचा आढावा घेतला जाणार आहे.

3)प्रकरण तिसरे :

कृषी क्षेत्रातील महिला शेतमजूरांचा सहभाग :

(Participation of women farm workers in theagricultural sector)

लातूर व नांदेड जिल्ह्यातील महिला शेतमजुरांचा कृषीक्षेत्रातील सहभाग मजुरांचे भारतातील महिला शेतमजुरांची स्थिती या पैलूंचा अभ्यास करण्यात येणार आहे.

4)प्रकरण चौथे :

लातूर व नांदेड जिल्ह्याची भौगोलिक, **आर्थिक व सामाजिक स्थिती** :

(Geographical, Economical and Social condition of Latue and Nanded District)

लातूर व नांदेड जिल्हयाची आर्थिक व सामाजिक स्थितीचे वैशिष्ट्ये आणि लातूर व नांदेड जिल्हयाचे भौगोलिक स्थान व प्राकृतिक रचना, सामाजिक स्थिती, आर्थिक स्थिती, कृषी क्षेत्र, प्रशासकीय क्षेत्र, प्रशासकीय विभाग, जमीन, लोकसंख्या, पिक रचना, साक्ष्यरता, पशुधन अभ्यास शेतकरी उत्पन्न पायाभूत सुविधा इ. आढावा घेण्यात येईल.

5) प्रकरण पाचवे :

महिला शेतमजुरांच्या निर्देशकांचे सांख्यिकीय विश्लेषण :

(Stastical analiysis of farmer labour women indicators): लातूर व नांदेड जिल्हयातील कृषी क्षेत्रातील महिला शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक

स्थितीचा अभ्यास प्रस्तुत प्रकरण हे प्रश्नावलीवर आधारीत आहे. या प्रकरणात लातूर व नांदेड जिल्हयातील महिला शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे. संकलित करण्यात आलेल्या माहितीवरून महिला शेतमजुरांची शैक्षणिक स्थिती पूरक व्यवसाय, रोजगाराचे प्रमाण, महिला शेतमजुरांचा संख्यात्मक आणी गुणात्मक स्थितीचा आढावा, मजुरी दर, बचतीचे प्रमाण इत्यादी आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे. महिला शेतमजुरांच्या सामाजिक स्थितीचा महिला शेतमजुरांची वैवाहिक स्थिती, शैक्षणिक स्थिती. पिळवणूक,दारिद्रयाचे प्रमाण यांचा विश्लेषणात्मक पद्धतीचा अभ्यास करण्यात आला आहे.

६) प्रकरण सहावे :

निष्कर्ष व शिफारशी : (Conclusion and Reasearch)

निष्कर्ष व शिफारशी या प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधनातून निघालेल्या निष्कर्ष नोंदवून काही महत्वपूर्ण शिफारशी सुचवण्यात आहेत.

शेतमजूर महिलांची आर्थिक व सामाजिक स्थिती :

(Economic and social status of women farm laborers)

महाराष्ट्र राज्यात शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर स्त्रिया कार्यरत आहेत. त्यामध्ये काही शेतकरी तर काही शेतमजूर आहेत. स्त्री शेतमजुरांना पुरुष शेतमजुरांच्या तुलनेत जास्त समस्यांना तोंड द्यावे लागते. महाराष्ट्र राज्यातील स्त्री शेतमजूरांच्या समस्या खालीलप्रमाणे दिसून येत आहेत.

ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जात असल्यामुळे स्त्री शेतमजुरांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येत आहे. शिक्षणाच्या अभावी स्त्री शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक विकासामध्ये अडचणी निर्माण होत आहेत.

स्त्री शेतमजुरांना घरगुती कामे पूर्ण करून दुसऱ्यांच्या शेतावरती मजुरी करावी लागते तसेच घरातील मुलांची व वृद्ध व्यक्तींची काळजी घ्यावी लागते. या सर्व गोष्टीमुळे स्त्री

शेतमजुरांची शारीरिक व मानसिक ओढाताण होत आहे. अलीकडील काळात स्त्री व पुरुष समान मानले जात असले तरी ग्रामीण भागात अजून देखील त्या प्रमाणात समानता प्रस्तापित झालेली नाही. एक तर स्त्री शेतमजूर असल्यामुळे त्यांना समाजात आवश्यक त्या प्रमाणात मान मिळत नाही तसेच घरातील पुरुषांकडून देखील काही प्रमाणात वाईट वागणूक दिली जाते.पुरुष शेतमजूर एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी कामासाठी स्थलांतर करू   शकतात मात्र मुलांच्या शाळा, कौटुंबिक जबाबदारी, बाहेरील वातावरण या सर्व गोष्टीमुळे स्त्री शेतमजुरांना स्थलांतर करण्यामध्ये अडचण निर्माण होते.
भारतामध्ये वेतनातील भेदभाव दूर करण्यासाठी सन १९७६ मध्ये समान वेतन कायदा लागू केला आहे. तथापि ग्रामीण भागात या कायद्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत नसल्यामुळे ग्रामीण भागात स्त्री-पुरुष समान काम करत असले तरी स्त्री शेतमजुरांना पुरुषांच्या तुलनेत कमी मजुरी दिली जाते.

समस्यांचे क्षेत्र : रोजगाराच्या संधी वाढणे हे अर्थव्यवस्थेच्या वाढीचे एक महत्त्वाचे सूचक आहे. जेव्हा अर्थव्यवस्था वाढते, तेव्हा व्यवसायांना अधिक उत्पादन आणि सेवा तयार करण्यासाठी अधिक कामगारांची आवश्यकता असते. यामुळे रोजगाराच्या संधी वाढतात.

1)कौटुंबिक समस्या : कुटुंब ही एक अशी पद्धत आहे, जिथे एकत्रित राहून अनेक नाती जपली जातात. एकत्र कुटुंब पद्धतीत एकाच छताखाली सर्व प्रेमाने राहतात, यालाच इंग्रजीमध्ये जॉइंट फॅमिली म्हणतात. दिवसेंदिवस शिक्षणासाठी किंवा नोकरी-व्यवसायासाठी मुले घराबाहेर पडतात; ज्यामुळे एकत्र कुटुंब पद्धत कमी होताना दिसत आहे.

2)सामाजिक समस्या: विकसित देशांनी शिक्षणाचे महत्त्व फार पूर्वीपासून ओळखले आहे, म्हणूनच, यापैकी अनेक देशांमध्ये शिक्षणाची सुविधा दिली जाते. दुसरीकडे, अनेक अविकसित देशांसाठी आणि जगाच्या आर्थिक दृष्ट्या संघर्ष करणाऱ्या भागांसाठी,

शिक्षणही एक लक्झरी आहे जी बहुतेकांना परवडणारी नसते. जगभरातील अनेक व्यक्तींना दर्जेदार शिक्षणाचा प्रवेश का नाकारला गेला आणि **21** व्या शतकातील आव्हानांना यशस्वीपणे तोंड देण्यासाठी त्यांच्याजवळ असलेले ज्ञान पुरेसे का नाही, याची कारणे आर्थिक, भौगोलिक आणि सामाजिक स्वरूपाची असू शकतात.

3)शाळांचा अभाव : जिथे शिकवले जाते त्या इमारतीपेक्षा शाळाही खूप जास्त आहे. शाळेमध्ये शिक्षक, अध्यापन साहित्य आणि शिक्षण प्रणाली बनवणाऱ्या इतर सर्व गोष्टींचा समावेश होतो. मात्र, या सगळ्यासाठी पैशांची गरज आहे. काही देशांची आर्थिक स्थिती अशी आहे की त्यांना मिळणाऱ्या सर्व मदतीनंतर ही त्यांच्या मुलांना आवश्यक ते शिक्षण देण्यासाठी शाळा बांधण्यासाठी पुरेसा निधी त्यांच्याकडे नाही.

संदर्भ सूची: (References)

१) डॉ. संजय कुलकर्णी "शिक्षण व आरोग्य धोरणे भारतातील अनुभव" आधार पब्लिकेशन -२०१८.

२) डॉ. साळुंखे सुनिल, "महाराष्ट्राचा आर्थिक विकास" आधुनिक प्रकाशन-२०२२.

३) डॉ. जोशी अजय "भारतातील दारिद्रय आणि विकास धोरणे" यशोद प्रकाशन-२०१६.

४) डॉ. शिंदे अनिल "महाराष्ट्रातील सामाजिक प्रश्न" मॉडर्न बुक डेपो-२०१८.

५)डॉ. जाधव स्वाती "भारतीय शिक्षण प्रणालीतील सुधारणा" निलम प्रकाशंन-२०२१.

६)डॉ. प्रणजीवन मेहता गांधी "भारतातील आर्थिक विकास आणि धोरणे" यशोदीप प्रकाशन-२०१६

(७) डॉ. सिंग एल. एस. "आर्थिक सिध्दांत, धोरणे आणि विकास" प्रभात प्रकाशन-२०१४.

८)डॉ. सिन्हा आर. के. "भारतातील नियोजन आणि विकास" आधुनिक प्रकाशन-२०१७.